## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ डिसेंबर २०१३

### अधिसूचना

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम १९६७.**

क्रमांक कृबास. १२११/प्र.क्र. ५२५/११-स.—ज्याअर्थी, सहकारी/खाजगी सूत गिरण्या, कापड गिरण्या, खाजगी जिनिंग प्रेसिंग युनिट व कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया, खाजगी बाजार यांना कापूस खरेदी करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे आणि ;

ज्याअर्थी, सन २०१३-२०१४ या हंगामात कापूस खरेदीवरील बाजार फी निश्चित करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे ;

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ३१(१) अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून, सन २०१३-१४ या हंगामासाठी कापूस खरेदी योजनेंतर्गत कापूस खरेदीसाठी कृषि उत्पन्न बाजार समित्यांना बाजार फीची १०० रुपयास असलेली किमान दराची मर्यादा काढून टाकण्यात येते. परंतु कमाल दराची मर्यादा १०० रुपयास १ रुपया या मर्यादेत व देखरेख फी प्रती १०० रुपयास ५ पैसे प्रमाणे आकारण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ना. ल. तडोसे,**

शासनाचे सहसचिव (पणन).